# <u>मुक्त आत्मा</u>

मुक्त आत्माचे अस्तित्व असते रेणुकणाहुन सुक्ष्म

शरीराच्या बंधनात नसताना असतो पंचतत्वाचा अंश..

सजीवाला भावनादायी मनाचे व बुद्धीदायी मेंदूचे वरदान आहे

निर्जीव मात्र सभोवतालच्या परिस्थितीवर अवलंबून आहे...

म्हणूनच मुक्त आत्म्याला सुद्धा मोह होतो सजीव बनण्याचा

कारण उर्जेला बदलण्याची शक्ती फक्त सजीवातच असते...

सजीवाच्या शरीराची बंधने, मर्यादा जेव्हा त्याला कळतात

तेव्हा तो जन्म मरणाचे फेरे संपवून मोक्षाचा ध्यास धरतो...

एकंदरीत काय तर , प्राप्त परिस्थितीत समाधान मानावे

मन आणि बुद्धी बरोबर आत्म्यालाही घ्यावे लागेल समजून...

ॐ श्री समर्पयामि! 🌹 🙏 !